**राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग व जिल्हा ग्राहक तक्रार निवारण मंचाच्या सदस्यांच्या एकत्रित मानधनात वाढ करण्याबाबत.....**

# महाराष्ट्र शासन

## अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग

**शासन निर्णय क्रमांकः संकिर्ण २०१३/३४०/प्र.क्र.८८/भाग ३/ग्रासं ४**

मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय विस्तार, मुंबई ४०००३२.
तारीख: १५ ऑक्टोबर, २०१६.

**प्रस्तावना :-**

राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग व जिल्हा ग्राहक तक्रार निवारण मंचातील सदस्यांच्या मानधन वाढीचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन असताना; जनहित याचिका क्र. १५६/२०११ मध्ये मा. उच्च न्यायालयाने, देशातील ग्राहक संरक्षण विभागाचे मंत्री, राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोगाचे अध्यक्ष इत्यादींची नवी दिल्ली येथे दिनांक १५ मार्च, २०१२ रोजी झालेल्या परिषदेमध्ये मानधन/वेतनाबाबत ठराव पारित करण्यात आला, त्या ठरावानुसार सदस्यांना अंतरिम व अंतिम निर्णय घेण्याचे आदेश दिनांक ६ ऑगस्ट, २०१४ रोजी दिले होते. त्यानुसार या विभागाच्या शासन निर्णय क्र. संकिर्ण-२०१३/३४०/प्र.क्र८८/ग्रासं-४, दि. १५.१२.२०१४ अन्वये राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग व जिल्हा ग्राहक तक्रार निवारण मंचातील पूर्णकालीन सदस्यांना हरियाणा राज्याप्रमाणे तर अंशकालीन सदस्यांना डॉ. पी.डी. शेनॉय समितीने शिफारस केल्याप्रमाणे मानधन व वाहन भत्ता लागू करण्यात आला आहे.

२. मा. उच्च न्यायालयाच्या दिनांक ६.८.२०१४ च्या आदेशानुसार राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग व जिल्हा ग्राहक तक्रार निवारण मंचाच्या सदस्यांना अनुक्रमे केंद्र शासनाच्या सह सचिव व संचालकांप्रमाणे वेतन व वेतनेतर प्राप्तीच्या (Pay and Perquisites) संदर्भातील प्रस्ताव दिनांक १३.१०.२०१६ रोजीच्या मंत्रिमंडळाच्या निर्णयासाठी ठेवण्यात आला.

**शासन निर्णय:-**

राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग व जिल्हा ग्राहक तक्रार निवारण मंचाच्या सदस्यांना अनुक्रमे केंद्र शासनाच्या सहसचिव व संचालक यांच्याप्रमाणे वेतन व वेतनेतर प्राप्ती लागू करण्याच्या संदर्भात मा. उच्च न्यायालयाच्या दिनांक ६.८.२०१४ च्या आदेशाच्या अनुषंगाने मंत्रिमंडळ बैठकीमध्ये सविस्तर चर्चा होऊन घेण्यात आलेल्या निर्णयानुसार पुढीलप्रमाणे मान्यता देण्यात येत आहे:-

१) राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोगाच्या सदस्यांना प्रतिमहा रु. ६२,०००/- एवढे एकत्रित मानधन व जिल्हा ग्राहक तक्रार निवारण मंचाच्या सदस्यांना प्रतिमहा रु. ४०,०००/- एवढे एकत्रित मानधन.

२) राज्य आयोग व जिल्हा मंचाकडे दाखल होणाऱ्या तक्रारी ग्राहक संरक्षण अधिनियम, १९८६ व त्या अंतर्गत तयार करण्यात आलेल्या नियमांनुसार

९० दिवसांमध्ये निकाली काढणे आवश्यक आहे. त्यामुळे सदर तक्रारी ९० दिवसांमध्ये निकाली काढण्याच्या संदर्भात राज्य आयोगाने आवश्यक ती उपाययोजना करावी व निकाली काढण्यात आलेल्या तक्रारींच्या संदर्भातील अहवाल पुढील महिन्याच्या ५ तारखेपर्यंत शासनास सादर करणे.

२. हे आदेश वित्त विभाग अनौपचारिक संदर्भ क्रमांक ५४९/व्यय-४, दिनांक १९.८.२०१६ नुसार निर्गमित करण्यात येत आहेत.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१६१०१५१७५११४८००६ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Uddhav Dattatrya Walunj

Digitally signed by Uddhav Dattatrya Walunj
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Deputy Secretary, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Uddhav Dattatrya Walunj
Date: 2016.10.15 17:55:42 +05'30'

( उ. द. वाळुंज )
उप सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रत,**

१) मा. राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई,
२) मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई,
३) मा. मंत्री, वित्त विभाग यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
४) मा. मंत्री, ( अ.ना.पु व ग्रा.सं.) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय,मुंबई,
५) मा. राज्यमंत्री ( अ.ना.पु व ग्रा.सं.) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय,मुंबई,
६) मा. अध्यक्ष, राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग, महाराष्ट्र, मुंबई,
७) प्रबंधक, राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग, महाराष्ट्र, मुंबई,
८) अ.मु.स. (वित्त), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई,
९) प्रधान सचिव ( अ.ना.पु व ग्रा.सं.), मंत्रालय, मुंबई,
१०) नियंत्रक, वैध मापन शास्त्र, महाराष्ट्र राज्य,मुंबई,
११) नियंत्रक, शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई,
१२) जिल्हाधिकारी (सर्व),
१३) अध्यक्ष, जिल्हा ग्राहक तक्रार निवारण मंच, (सर्व),
१४) सहसचिव/सर्व उप सचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई,
१५) सर्व अवर सचिव/कक्ष अधिकारी, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई,
१६) प्रबंधक, सर्व जिल्हा ग्राहक तक्रार निवारण मंच,
१७) जिल्हा कोषागार अधिकारी (सर्व),
१८) जिल्हा पुरवठा अधिकारी (सर्व),
१९) निवडनस्ती/ग्रासं-४.